जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# एमबीएच्या पाच विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये विभागाच्या पाच विद्यार्थ्यांची जस्ट डायल कंपनीमध्ये निवड झाली आहे. कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक अरीफ शिकलगार यांच्या उपस्थितीत शनिवारी मुलाखती घेण्यात आल्या होत्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये केतन परदेशी, रोहन कुलकर्णी, अभिषेक पाटील, प्रतीक बागवाले, संजयकुमार भोसले यांचा समावेश आहे. सेंट्रल प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एन. भोसले व एमबीए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. संकेत रावण यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 MAY 2017 तरुण भारत

# विद्यापीठच्या पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए अधिविभागामधील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यू मधून 'जस्ट डायल' या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन हे 'जस्ट डायल' कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक अरिफ शिकलगार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कॅमूम्पस इंटरवह्यूमधून एम. बी. ए अधिविभागातील केतन परदेशी, रोहन कुलकर्णी, अभिषेक पाटील, प्रतिक बागवाले, व संजयकुमार भोसले या विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. सदरच्या कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन शिवाजी विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एन. भोसले व एम. बी. ए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार; संकेत रावण यांनी नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# रौप्यमहोत्सवी आकाशवाणी



'आकाशवाणी' हे भारतीय जनमानसाच्या अत्यंत जवळचे मनामनातील असे माध्यम आहे. मार्कोनी या इटालियन शास्त्रज्ञाने रेडिओचा शोध लावला आणि पेटंट मिळवले. रेडिओच्या शोधामध्ये अनेक शास्त्रज्ञांचे योगदान असले तरी मार्कोनीला श्रेय दिले जाते. रेडिओच्या शोधामुळे मानवी आवाजाचे प्रसारण लांबवर करता येणे शक्य झाले.

संगीत, लोकगीते हा रेडिओचा आत्मा आहे. कलाकारांच्या गाण्यांच्या ध्वनीफिती जतन करता येणे शक्य झाले. भारतीय आकाशवाणीच्या अव्हाईज; अभिलेख विभागात आपल्या राष्ट्रीय महत्वाच्या नेत्यांची दूर्मीळ मुलाखती, भाषणे आणि कलाकारांचे संगीत या विषयीचा महत्वाचा दस्तऐवज उपलब्ध आहे. भारतीय स्वातंत्र्यपासून ते आजतागायत राष्ट्रीय निर्मिती प्रकियेतील प्रत्येक टप्प्यांचा अमूल्य ठेवा उपलब्ध आहे.

रेडिओ किंवा नभोवाणी हा माध्यमांचा प्रकार काळानुरूप बदलत गेल्याने, या माध्यमांचा ताजेपणा श्रोत्यांना आकर्षित करतो. दोन्ही महायुद्धांच्या काळात रेडिओवरील युद्धविषयक घडामोडी जाणून घेण्यासाठी रेडिओवरील बातमीपत्रे हा अत्यंत महत्वाचा विषय होता. भारतामध्ये १९२७ ला मुंबई येथे रेडिओ प्रसारणाला सुरूवात झाली. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आकाशवाणीची केंद्रांची संख्या ही एकूण पाच होती, ती आज ४२०पर्यंत पोहचली आहे. रेडिओला दिलेले भारतीय नाव म्हणजे आकाशवाणी आहे. आकाशवाणी हे भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणा-या प्रसार भारती या स्वायत्त महमंडळाचा एक महत्वाचा भाग आहे. बहुजन हिताय... बहुजन सुखाय या ब्रिदवाक्याने गेली ९० वर्षे आकाशवाणी माहिती, मनोरंजन, शिक्षण या तीन सुत्रांवर आधारीत अव्याहत विविध कार्यक्रम श्रोत्यांसाठी प्रसारीत करत आहे. २००८च्या डीटीएच सेवेमुळे भारतीय आकाशवाणी श्रोत्यांसाठी चोवीस तास उपलब्ध आहे. भारतीय आकाशवाणीची रचना ही राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक अशी त्रिस्तरीय आहे.

स्थानिक श्रोत्यांना आकाशवाणीच्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी तसेच त्यांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे कार्यक्रम ऐकता यावे यासाठी देशभरात एफ. एम. केंद्र सुरू करण्यात आले. १५ मे १९९२ ला कोल्हापूरला आकाशवाणीचे एम. एम. केंद्र सुरू करण्यात आले. आज कोल्हापूर आकाशवाणीला पंचवीस वर्षे पूर्ण झाली असून, आकाशवाणीने रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. कोल्हापूर आकाशवाणी केंद्र हे एकशे दोन दशांश सात मेगाहर्टस्वर प्रसारित करण्यात येते. हिंदी, मराठी चित्रपटगीते, सुगमसंगीत, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, बाह्यगीते, युवक, महिला व बालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम, कृषी विषयक कार्यक्रम, फोन-इन कार्यक्रम, हॅलो गीत बहार यांसारखे कार्यक्रम प्रसारित करण्यात येतात. किसानवाणी हा कृषिविषयक कार्यक्रम, युवावाणी या कार्यक्रमासाह, पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांचे मन की बात या कार्यक्रमाचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. 'मन की बात'चे भाषांतर मराठीतून महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारित करण्यात येतो. स्नेहांकित हा पत्रोत्तरांवर आधारित कार्यक्रम, आरोग्य सल्ला, भक्ती संगीत आणि आकाशवाणी पुणे केंद्रावरून प्रसारित होणारे बातमीपत्र कार्यक्रम मुख्यत: मराठी आणि हिंदी भाषेतून प्रसारित होतात. यामध्ये पन्नास टक्के कार्यक्रमांची निर्मिती ही या केंद्राची असून, उर्वरित कार्यक्रम हे विविध भारती आणि प्रायोजित स्वरूपाचे असतात. उत्तम निवेदन, उत्कृष्ट भाषाषैली, शुद्ध आणि स्पष्ट उच्चार, चांगले कार्यक्रम अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग, दर्जेदार आणि कल्पक निर्मिती ही या केंद्रांची जशी जमेची बाजू आहे, तसेच केंद्रप्रमुख व अभियांत्रिकी विभाग यांचे योगदान मोलाचे आहे.

सध्या सर्वच मोठ्या शहारांमध्ये आकाशवाणी केंद्रांबरोबरच एकापेक्षा अधिक खासगी रेडिओ उपलब्ध असल्याने तीव्र स्पर्धा तयार झाली असली तरी आकाशवाणीने आपले स्थान टिकवण्यासाठी कार्यक्रम आशय व निर्मिती यामध्ये बदल करून, प्रायोजित कार्यक्रमांवर भर दिला आहे. हे करत असतानाही लोकविकास, लोकशिक्षणबरोबर मनोरंजन कोल्हापूर आकाशवाणी करत आहे. सध्या कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्याच्या नव्वद किलोमीटरपर्यंत कोल्हापूर आकाशवाणी केंद्र पोहोचले आहे. अभिजात कार्यक्रमांचे प्रसारण करून मराठी मनांची मशागत करणा-या कोल्हापूर आकाशवाणी केंद्राच्या भावी वाटचालीस आपण श्रोता म्हणून शुभेच्छा देणे आवश्यक आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com